## हॅलो नागपूर.

# # क्विक Update



## तीर्थदर्शन योजनेतून ८०० भाविक बोधगयेला जाणार

**नागपूर :** शासनाच्या मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेअंतर्गत सामाजिक न्याय विभागाच्या वतीने नागपूरहून महाबोधी मंदिर, बोधगया येथे ८०० ज्येष्ठ नागरिक बुधवारी दुपारी २.१५ वाजता विशेष रेल्वेने रवाना होत आहेत. याचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती समाजकल्याण विभागाच्या सहायक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी दिली आहे.